**इचलकरंजी महानगरपालिका**

**महिला व बालकल्याण विभाग**

**जाहिर प्रकटन**

इचलकरंजी महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागाकडील बालवाडी विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे पोषक आहार पुरविणे अंदाजपत्रक रक्कम रु. ५,०८,५९९/- कामाची परसेंटेज दराचे दुहेरी लिफाफा पध्दतीने कोटेशन मागविणेत येत आहे. येणार आहेत.

| अ.क्र. | वार | पदार्थांचे नाव | प्रमाण | दर | विदयार्थी संख्या | दिवस | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सोमवार | राजगीरा लाडू | ५० ग्रॅम | १२/- | ३७८ | १३ | ५८,९६८/- |
| २ | मंगळवार | शेंगदाने चिक्की (५० ग्रॅम) | ५० ग्रॅम | ११.५०/- | ३७८ | १३ | ५६,५११/- |
| ३ | बुधवार | ड्रायफुड (काजू,बदाम,मनुके, खजुर इ. ) | ५० ग्रॅम | २२/- | ३७८ | १३ | १,०८,१०८/- |
| ४ | गुरुवार | देशी केळी (२ नग) | ५० ग्रॅम | १५/- | ३७८ | १३ | ७३,७१०/- |
| ५ | शुक्रवार | सफरचंद (१ नग) | ५० ग्रॅम | २६/- | ३७८ | १३ | १,२७,७६४/- |
| ६ | शनिवार | उपिट/पोहे/शिरा | १ प्लेट | १७/- | ३७८ | १३ | ८३,५३८/- |
| | | | | | | | **५,०८,५९९/-** |
| | | GST १८% | | | | | **९१५४७.८२** |
| | | | | | | **एकूण** | **६,००,१४६.८२** |
| | | **Say** | | | | | **६,००,१४७.००** |

**<u>वरील कामी दुहेरी लिफाफा पध्दतीचा अवलंब करणेत येत आहे.</u>**

अ) लिफाफा क्रं.१ मध्ये खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

१) बयाणा रक्कम रक्कम रु. ५,१००/- ऑनलाईन पध्दतीने भरणेची आहे.
२) संस्था नोंदणी प्रमाणपत्र
३) अन्न व औषध प्रशासन यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र
४) संबंधीत कामानुसार अनुभव कागदपत्रे
५) मक्तेदाराचे पॅन कार्ड याची सत्य प्रत.
६) मक्तेदाराचा E.P.F अकौंट क्रमांक असणे आवश्यक.
७) मक्तेदाराचा G.S.T. अकौंट क्रमांक असणे आवश्यक.
८) निविदा कराच्या वतीने कोणास प्राधिकृत केले असलेस त्या बाबत कुल मुखत्यारपत्र.
९) आर्थिक सक्षमता - बँक सॉलवन्सी/ IT रिटर्न
१०) मक्तेदार कोणत्याही शासकिय/निमशासकिय संस्थेच्या काळया यादीत नसलेबाबतचे प्रतिज्ञापत्र
११) Form IB ( रु. १००/- च्या स्टॅंपपेपवर)

Scanned with CamScanner

ब) लिफाफा क्रं.२ मध्ये खालील कागदपत्रे अपलोड करणेत यावे.

१) कोटेशनाचे परसेंटेज दर हे अक्षरी व अंकी पुरवठाधारकाने साक्षांकीत केलेले.

२) परिशिष्ट अ

३) अंदाजपत्रक पेक्षा कमी दर असल्यास नियमाप्रमाणे बँक हमीपत्र देणे बंधनकारक राहील.

(तैमूर मुल्लाणी)
उपायुक्त
इचलकरंजी महानगरपालिका

---

अटी / शर्ती-

१. ज्यांचे कोटेशन मंजुर होईल त्यांचे बिलातुन १% इतकी रक्कम डिपॉझीटपोटी वजा करुन घेतली जाईल व काम पूर्ण झालेनंतर ६ महिन्यांनी परत केली जाईल.

२. कोटेशन दर दि. १४ /०२ /२०२४ रोजी स.११.०० वाजले पासून दि.२०/०२ /२०२४ रोजी दु.२.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पहावयास मिळतील.

३. कोटेशन दर सादर करण्याची अंतिम दिनांक.२०/२ /२०२४ दुपारी २.०० वाजेपर्यंत राहील.

४. शक्य झालेस प्राप्त कोटेशन दर दि.२१/२ /२०२४ दुपारी ४.०० वाजता उपस्थित पुरवठाधारक यांचे समोर उघडणेत येईल.

५. कोणतेही कोटेशन दर मंजूर अथवा नामंजूर करणेचे अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवलेले आहेत. त्याची कोणतीही कारणे दिली जाणार नाही.

६. संस्थेने स्टेनलेस स्टीलच्या हवाबंद डब्यातून पोषक आहार पुरविणे आवश्यक आहे.

७. दरपत्रक / कोटेशन स्विकृत केल्याचे पात्र संस्थेस इकडून लेखी कळविणेत येईल. त्यानुसार जास्तीत जास्त सात (७ ) दिवसात योग्य त्या स्टँपवर विहीत नमुन्यात लेखी करारनामा स्वखर्चाने करुन देणेचा आहे. व आवश्यक त्या बयाणा व सुरक्षा रक्कमेचा भरणा करणे संस्थेस बंधनकारक राहील.

८. संबंधीत बालवाडी कामकाजाच्या प्रत्येक दिवशी इकडील सुचनेप्रमाणे ताज्या पोषक आहाराचा तसेच पुरक आहाराचा पुरवठा संबंधीतांनी बालवाडी पर्यंत करावा लागेल. आहाराचा पुरवठा संबंधीतांनी बालवाडी मागणीपत्रानुसार आवश्यक तेवढयाच प्रमाणात करावा लागेल.

९. इकडील सुचनेप्रमाणे आहार पुरवठयाचा वाहतुक खर्च स्वखर्चाने करणेचा आहे.

१०. आहारचा पुरवठा हा स्वच्छ व ताज्या स्वरुपात विद्यार्थ्यांना करावयाचा आहे.

११. प्रत्यक्ष पुरवठा करावयाचा आहार शाळेतील बालवाडी शिक्षिकांच्या समोर वजन करुन दिला पाहिजे आणि तसे केलेबद्दल संबंधितांची पोच घेतली पाहिजे.

१२. अर्जदार संस्थेने सादर केलेल्या सर्व कागदपत्रातील प्रत्येक पानावर त्यांची सही व शिक्का तसेच पानांकन असणे आवश्यक आहे. सर्व कागदपत्रांवर सही व शिक्का नसल्यास अर्जदाराचा विचार करता येणार नाही.

१३. आहार पुरवठा करण्यासाठी मागविण्यात आलेले दरपत्रक / कोटेशन अर्ज कुठलेही लेखी अथवा तोंडी कारण न देता स्विकृत करणे, नाकारणे किंवा रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्तसो / उपायुक्तसो यांना राहील.

१४. संस्थेस देणेत येणारी बालवाडी व विद्यार्थी संख्या यामध्ये बदल करण्याचा अधिकार मा. आयुक्तसो यांना राहील.

१५. निकृष्ट दर्जाचा आहार पुरविल्यामुळे / उशिरा आहार पुरविल्यामुळे किंवा अन्य कारणास्तव पुरवठादार संस्थेस दंड आकारण्यात आल्यास, दंडाच्या रक्कमेची वसुली ही प्रथम त्यांचे देयकामधुन करण्यात येईल व दंडाची रक्कम देयकापेक्षा अधिक झाल्यास त्याची वसुली सुरक्षा अनामत रक्कमेतून करण्यात येईल.

Scanned with CamScanner

१६. वरील अटी / शर्तीमध्ये आवश्यक ती वाढ करणे / सुधारणा करणे याबाबतचा अधिकार मा. आयुक्तसाो व मा. उपायुक्तसाो यांना राहतील.

१७. उपरोक्त योजनेच्या अमंलबजावणीच्या अनुषंगाने संबंधित संस्थेस प्राप्त होणा-या रक्कमेवर आयकर विभाग व इतर विभागाकडून वेळोवेळी लागू करण्यात आलेला कर संस्थेने संबंधित विभागास भरणे / कपात करुन घेणे बंधनकारक असेल.

१८. सदर कामी सर्व शासकीय कर, विमा प्राव्हीडंट फंड वगैरे भरणेचे जबाबदारी संस्थेची राहील.

१९. याकामी महानगरपालिकाकडे उपलब्ध असलेल्या निधीप्रमाणे देयक आदा केले जाईल.विलंबाबाबत कोणतेही व्याज तसेच याबाबत कोणत्याही न्यायालयात दाद मागता येणार नाही.

२०. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील सर्व संबधित तरतुदी लागु राहतील.

**(तैमूर मुलाणी)**
उपायुक्त
इचलकरंजी महानगरपालिका

Scanned with CamScanner